/

# दरपत्रक मागणी

जाक्र.ताआअकामा/एनएचएम/दरपत्रक/८७/२०२५
तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय वैभववाडी
दि. ११.११.२०२५

सन २०२५.२०२६ या आर्थिक वर्षात तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय वैभववाडी अंतर्गत नागरी आरोग्यवर्धीनी केंद्रा करिता Yoga Mat खरेदी करावयाचे आहेत. तरी सदर कामासाठी इच्छुक दरपत्रक धारकांकडुन खालील तपशिलात नमुद केलेप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | वस्तुचे नाव | तपशील | अंदाजित नगसंख्या |
|---|---|---|---|
| १ | Yoga Mat | 6 Mm Premium Anti-Skid Super Soft Single Colour Type Yoga Mat with Carry Bag | 25 |

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिदध झालेल्या दिनांकापासुन ७ दिवसांपर्यत व शेवटच्या दिवशी दु.३.०० वाजेपर्यंत विहित नमुन्यात परिपुर्ण दरपत्रक बंद लखोटयातुन या कार्यालयास समक्ष आणुन अथवा डाक सेवादवारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्ती पुर्ण झालेली दरपत्रके खोलुन तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल.

**दरपत्रकाच्या अटी व शर्ती**

१)दरपत्रक सादर करतेवेळी दरपत्रकासोबत शासकिय संस्थेमार्फत दिलेला नोंदणी दाखला/जिएसटी नोंदणी प्रमाणपत्र तसेच नोदणीपत्रकावर नमुद मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत जोडावयाचे आहेत. अन्यथा सदरची दरपत्रक नामंजुर करण्यात येतील.

२)दरप्रत्रकातील दर हे सर्व करासहीत तसेच या कार्यालयाकडे पोहच करावयाच्या व जोडणीच्या सर्व खर्चासहीत नमुद असावेत. दरपत्रकात नमुद दरा व्यतिरिक्त इतर कोणतीही अतिरिक्त दर अदा केले जाणार नाही.

३)ज्या दरपत्रक धारकांचे दरपत्रक मंजुर होईल त्यांनी आदेश दिलेपासुन दरपत्रकात नमूद काम हे ७ दिवसांत पुर्ण करणे बंधन कारक राहील.तसेच सदर दर हे माहे मार्च २०२६ कालावधीसाठी ग्राहय राहतील याची नोंद घ्यावी.तसेच वस्तुच्या नग संख्यमधे आवश्यतेप्रमाणे अनुदानाच्या उपलब्धतेनुसार बदल होवु शकतो.

४)मंजुर दरपत्रकानुसार सदर काम पुर्ण झालेवर सर्व करांसहीत झालेल्या कामाचे देयक कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

५)मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवला आहे.

६)सदर तपशिला नुसार एका नगाचा दर सादर करावयाचा आहे. आवश्यकतेनुसार व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार खरेदीचा आदेश देण्यात येईल.

**दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण**

तलुका आरोग्य अधिकारी कार्यालय वैभववाडी नोटीसबोर्ड

**पत्ता -तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय वैभववाडी, ग्रामिण रुग्णालय वैभववाडी च्या मागे**

**मोबा - 8468895934**

www.nrhm.maharashtra.gov.in वरील संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिदध झालेल्या तारखेपासुन ७ दिवसांच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील यांची नोंद घ्यावी.

डॉ. अनुराधा गणेश बिराजदार
तालुका आरोग्य अधिकारी
तालुका वैभववाडी